# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाकरिता नागपूर येथील स्थानिक छायाचित्रकाराची नियुक्ती करण्यासंदर्भात.

विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या सत्र तसेच नि:सत्र कालावधीतील विविध कार्यक्रमासाठी छायाचित्र काढणे व छायाचित्रण करणे तसेच, फोटो लॅमिनेशन व फोटोफ्रेम तयार करण्यासाठी छायाचित्रकार नियुक्त करण्याकरिता नागपूर येथील स्थानिक छायाचित्रकार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

छायाचित्रकारांनी दरपत्रक भरण्यापूर्वी कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ शाखा, कक्ष क्रं.०१७ तळमजला, विधान भवन, मुंबई यांचेकडून या सचिवालयास आवश्यक असलेल्या छायाचित्रण करण्याच्या तसेच छायाचित्र काढण्याच्या कामांच्या तपशिलानुसार दरपत्रकात दर नमूद करुन दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक ३ जून, २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**